# एम.ए – II – सेम – राज्यशास्त्र

## पेपर 2 – पाश्चात्य राजकीय विचार

प्रा.डॉ.सुशांत चिमणकर

### Unit – III – उपयोगितावादाचा सिद्धांत (बेन्थम  आणि मिल)

बेन्थम यांच्या उयोगितावाद – बेन्थम यांच्या मते कोणत्याही वस्तूचे, कार्याचे अथवा प्रसंगाचे, घटनेचे चांगले-वाईटपण, योग्य-अयोग्यता, न्याय-अन्याय, औचित्य-अनौचित्य हे तिच्या उपयोगीतेवरच आधारलेले असते. ज्या कार्यापासून सुख मिळते ते योग्य किंवा चांगले आणि ज्या कार्यापासून दु:ख मिळते ते अयोग्य किंवा समजले जाते. दु:ख कमी करून सुखाच्या प्राप्तीसाठी होणाऱ्या प्रयत्नालाच बेन्थम बेंथम याने उपयोगितावाद असे संबोधले आहे.

उपयोगितावादाचे स्वरूप – १.सुख दु:ख संकल्पना – बेंथम उपयोगितावादानुसार ज्या कार्यापासून मनुष्याच्या सुखामध्ये वाढ होते ते कार्य उचित व इष्ट समजले जाते तर ज्या वस्तूपासून किंवा कार्यापासून मनुष्याला दु:ख होते ते कार्य किंवा वस्तू अनुचित किंवा अनिष्ट समजली जाते. मानवाची सर्व कार्य उपयोगीतेच्या आधारावर होत असतात. बेंथमच्या मते प्रत्येक मनुष्य सुखाच्या प्राप्तीसाठी धडपडत असतो तसेच दु:ख निवारण्याचा तो नेहमी प्रयत्न करीत असतो. प्रत्येक मनुष्य आनंदाच्या व सुखाच्या शोधात असतो. म्हणूनच सुखात वाढ करणारे कार्य योग्य होय तर दु:ख वाढविणारे कार्य अनुचित समजले जाते.

२.योग्य व अयोग्य कार्याचे वर्गीकरण – बेंथमने आपल्या उपयोगीतावादात योग्य व अयोग्य कार्याचे वर्गीकरण केले आहे.त्याच्या मते कार्याचे औचित्य किंवा अनौचित्य, न्यायता हे त्याच्या उपयोगितेवरून ठरत असते. उपयोगितेचा संबंध केवळ व्यक्तीशी नसून राज्याच्या कार्याशी आहे. राज्याचे कार्य हे व्यक्तीच्या किंवा समाजाच्या उपयोगी पडत असेल ते उपयोगी असेल ते उपयोगी राहील. राज्याची योग्यता बेंथम समाजासाठी केलेल्या कार्यावरून ठरवितो. त्याच्या मते उपयोगिता ही व्यक्तिगत व सामाजिक स्वरुपाची असू शकते.

३.उपयोगिता हीच कसोटी – बेंथम च्या मते, ‘निसर्गाने मनुष्याला सुख व दु:ख या दोन सार्वभौमशक्तीच्या नियत्रण ठेवले आहे. आपल्या सर्व कृतीवर किंवा वर्तनावर त्याचेच नियंत्रण असते.

सुखात वाढ करणे व दु:ख कमी करणे हाच वस्तूचा उपयोगीतेचा मापदंड असतो. म्हणजे ज्या वस्तूच्या उपभोगापासून जास्त सुख मिळेल तेवढी तिची उपयोगिता जास्त व जेवढे जास्त दु:ख मिळेल तेवढी त्या वस्तूची उपयोगिता कमी समजली जाते. बेंथमच्या उपयोगीतावादी दृष्टीकोनातून सुख हे मानवी जीवनाचे साध्य आहे म्हणूनच तो मानवाच्या सुखप्राप्तीसाठी होणाऱ्या प्रयत्नालाच उपयोगीतावाद संबोधतो. राज्याने कार्य करतांना 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' याच तत्त्वाचा आधार घेतो.

सुख –दु:खाची कारणे –

१.भौतिक किंवा नैसर्गिक कारणे २.राजकीय कारणे ३.लौकिक कारणे ४.नैतिक कारणे ५.धार्मिक कारणे

उपयोगिता सिद्धांतावरील टीका –

(अ)केवळ भौतिकवादी (ब)गुणात्मक सुखाकडे दुर्लक्ष (क)सुख-दु:खाचे मापन अशक्य (ड)अव्याहारिक सिद्धांत (ए)मानसशास्त्रीय दृष्टीने प्रकिया (ई)अंकगणिताच्या सहायाने उपयोगिता

अशाप्रकारे बेंथम याच्या उपयोगीतावादावर अनेक राजकीय विचारवंतानी टीका केली असली तरी राजकीय विचारात बेंथम याने उपयोगितावादी सिद्धांतात मोठी भर टाकली आहे. त्यामुळे त्याचे राजकीय विचारतील स्थान अत्यंत महत्वाचे मानले जाते.

## मिलचा उपयोगीतावाद

बेंथम आपल्या उपयोगितावादाचा पुरुस्कार करतांना असे मत मांडतो की, 'प्रत्येक मनुष्य अशीच कृती करतो की, जिच्यापासून जास्तीत जास्त सुख प्राप्त होईल आणि दु:खापासून मुक्तता होईल. राज्यानेही राज्य कारभार करतांना अधिकतमांचे अधिकतम सुख' हे तत्व स्वीकारले पाहिजे'

बेंथमच्या मते, सुखामध्ये गुणात्मक फरक नाही. असे बेंथम म्हणतो. तीव्रता, कालावधी, निकटता, निश्चितता, उत्पादकता, शुद्धता इत्यादी सुख-दु:ख मोजण्याची मापे आहेत.

परंतु मिलने बेंथमचे मत मान्य करूनही त्यामध्ये परिवर्तन केले आहे.

१.सुखामध्ये मात्रात्मक आणि गुणात्मक अंतर आहे – बेंथम सुखामध्ये मात्रात्मक भेद मानतो, गुणात्मक फरक मानीत नाही. परंतु मिल, 'बेंथमचा सुखवाद आपल्या कार्याची दिशा उपयोगितेनुसारच ठरते' असे

जरी मान्य करीत असला तरीही सुखामध्ये केवळ मात्रात्मक फरक नसून गुणात्मक असतो, हे मत मांडतो. मिलच्या मते, सुखांमध्ये गुणात्मक फरक मानने उचित आहे. काही सुखांमध्ये मात्रात्मक फरक कमी असूनही ती सुखे प्राप्त करणे इष्ट आहे. कारण ती श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यासाठी मिल एक उदाहरण देतांना म्हणतो, 'संतुष्ट डुकरापेक्षा असंतुष्ट मानव होणे किंवा संतुष्ट मूर्ख होण्यापेक्षा असंतुष्ट सोक्रेटीश होण्याची अपेक्षा करणे ही केव्हाही श्रेष्ठ कृतीच होय.' यावरून सुखामध्ये केवळ मात्रात्मक फरक नसून गुणात्मक फरकही असतो, हेच मिल ने सिद्ध केले आहे.

२.सुख-दु:खाचे मोजमाप करता येत नाही – सुखामध्ये गुणात्मक फरक दाखविल्यामुळे मिलने, बेंथमने सांगितलेले सुखाचे मापदंड अयोग्य मानले. मिल म्हणतो, 'दारुड्याला दारू पिण्यापासून मात्रात्मक सुख जास्त मिळत असले, तरी ते सुख अनुचित म्हणजेच अयोग्य सुख आहे. कारण ते निकृष्ट प्रतीचे सुख आहे. तसेच सुख मापण्यासाठी बेंथमने सांगितलेले तीव्रता, कालावधी इत्यादी मापदंड सर्व मनुष्यात समान राहतात असे नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने सुख-दुखाचे मोजमाप करता येत नाही.

३.कायद्याचा आधार उपयोगिता नाही – बेंथमने कायद्याचा आधार 'अधिकतमांचे अधिकतम सुख' हाच योग्य मानला आहे. अधिकतम सुखाचा आधार उपयोगितेनुसार ठरतो. परंतु उपयोगितेचे जर ठीक मोजमाप होऊ शकत नाही तर 'अधिकतमांचे अधिकतम सुख' ओळखायचे कसे? प्रत्येक व्यक्ती जर आपलेच सुख पाहते तर अधिकतमाचे अधिकतम सुख कसे मिळेल? तर असा आरोप बेंथमवर अनेक शास्त्रज्ञानी केला. त्याचे उत्तर मिल असे देतो की, सुख हे तत्काळ स्वरुपात प्राप्त होत नाही. दुसऱ्यांच्या सुखामाध्येही एखाद्याचे सुख समावलेले असते; आणि सुखाच्या प्राप्तीसाठी ती व्यक्ती दुसऱ्यांचे हित साधण्याचा प्रयत्न करते. याचाच अर्थ आपल्या सुखाची प्राप्ती अप्रत्यक्षरित्या होत नाही तर दुसऱ्यांच्या सेवेतच आपले सुख प्राप्त होते.

एकूण मिलच्या मते, व्यक्ती केवळ स्वार्थासाठी सुखाचा शोध घेत नाही, तर परमार्थाच्या भावनेतूनही कार्यासाठी ती प्रेरित होते. समाज हा स्वार्थी लोकांचा समूह नाही. सामाजिक हित व्यक्तिगत हितापेक्षा श्रेष्ठ असल्यामुळेच सुखाचे साधन आणि साध्य नैतीकताच आहे. ही नैतिकता न्याय आणि सहानुभूतीवर आधारित आहे. उपयोगिता तत्वाला केवळ बाह्य मान्यतेची गरज नाही तर आत्मिक मान्यतेची गरज आहे. अशारितीने विरोधकांना शांत करण्यासाठी मिलने, बेंठ्मच्या सुखवादामध्ये आमुलाग्र परिवर्तन केले.

# UNIT – IV - शास्त्रीय समाजवाद : मार्क्स

शास्त्रीय समाजवादाचा जनक म्हणून कार्ल मार्क्सकडे पहिले जाते. साम्यवादाचा किंवा शास्त्रीय समाजवादाचा विचार कार्ल मार्क्सने मांडला. राजकाणारवर अर्थकारणाचे प्रभुत्व असते असा विचार कार्ल मार्क्सने व्यक्त केला. ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टीकोन मांडून कार्ल मार्क्सने समाजाच्या विकासाचे विविध टप्पे स्पष्ट केले. कार्ल मार्क्सच्या विचाराआधी विचारवंतांनी जे सिद्धांत मांडले त्यात अर्थकारणाला अधिक महत्व दिले गेले नव्हते. भौतिक गोष्टीमध्ये कार्ल मार्क्सच्या विचारांनी चैतन्य निर्माण केले. कार्ल मार्क्सच्या अगोदर विचारवंतानी जे सिद्धांत मांडले त्यात अध्यात्मिक विचारांना महत्वपूर्ण स्थान दिले होते. साहजिकच अध्यात्मिक प्रभावाऐवजी भौतिकवादाला महत्वपूर्ण स्थान मिळाले. त्याने भौतिकवादात समाजाच्या विकासाचे टप्पे स्पष्ट करून आदिम अवस्थेत प्राचीन साम्यवाद होता व शेवटचा टप्पा देखील साम्यवादाचा असेल असे स्पष्ट केले. कार्ल मार्क्सने 'धर्माला अफूची गोळी' असे मानून धर्मव्यवस्थेवर आघात केला. धर्माच्या नावावर जि कामगारवर्गाची पिळवणूक होत होती त्याविरुद्ध द्वंद्व करण्याची प्रेरणा कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाने दिली.

## सामाजिक क्रांतीत योगदान –

१.कामगार संघटन – कार्ल मार्क्सने जे विचार मांडले ते क्रांतिकारी स्वरूपाचे होते. त्याने कम्युनिस्ट मेनिफेस्टो' या ग्रंथात कामगारांना संदेश दिला. 'जगातील कामगारांनो एक व्हा ! या संदेशामुळे कामगारवर्गात जागृती निर्माण झाली. त्यांनी प्रस्थापित भांडवलशाही विरुद्ध संघटन करून, आपली पिळवणूक थांबविण्याचा प्रयत्न केला. अप्रत्यक्षपणे भांडवलशाहीला विरोध दर्शवून त्यातील दोष स्पष्ट करून क्रांतीचे स्फुल्लिंग पेटविले.

२.आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची स्थापना – कार्ल मार्क्सने 'आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची' स्थपना केली. मजुरांच्या संघटनेचा विजय व भांडवलशाहीचा नाश हे अंतिम शाश्वत सत्य आहे असे मत व्यक्त केल्याने तात्पुरत्या काळापुरता का होईना त्याचा विचारसरणी प्रभाव पडला. व रशियात १९१७ साली लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक पक्षाने झारशाही उलथून टाकली व क्रांतीची मुहुर्तमेढ रोवली. रशियाने साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार केला.

३.साम्यवादी विचारांचा प्रभाव – १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाले, १९४५ मध्ये संपले. या महायुद्धानंतर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव अनेक राष्ट्रावर पडला. साम्यवाद नसतांनाही अनेक देशात साम्यवादी पक्ष अस्तित्वात आला. साम्यवाद विचारांचा प्रभाव ज्या-ज्या राष्ट्रात आहे त्या-त्या राष्ट्रातील सरकारांवर साम्यवादाचे नियंत्रण प्रस्थापित झाल्याचे दिसून येते.

४.भांडवलशाही राष्ट्रांवर साम्यवादी विचारांचा प्रभाव – कार्ल मार्क्सच्या अगोदरच्या विचारवंतानी साम्यवादी विचारसरणी विस्कटलेल्या अवस्थेत मांडण्याचा प्रयत्न केला होता. पण कार्ल मार्क्सने या विचारांचे सुसूत्र संघटन केले. कार्ल मार्क्सचे विचार हे मानवतावादी होते. शोषितांनी शोषकांविरुद्ध संघटन करून एकत्र यावे व आपली पिळवणूक थांबवण्याचा प्रयत्न करावा असे मत कार्ल मार्क्सने मांडले. या विचाराचा प्रभाव कामगारवर्गावर झाला.

५.कामगार जागृती – कार्ल मार्क्सने आपल्या विश्लेषणात अतिरिक्त मुल्यांचा सिद्धान्त मांडून भांडवलदार वर्ग, कामगारांचे कसे शोषण करतो हे स्पष्ट करून सांगितले. कार्ल मार्क्सने असे नमूद केले होते की, भांडवलदार कामगाराकडून १० तास काम करवून घेत असेल व मोबदला ८ तासाचाच देत असेल तर २ तासांचे अतिरिक्त मूल्य भांडवलदाराच्या खिशात जाते. म्हणजे कामगारांचे २ तासाचे कार्य विनामोबदला स्वरूपाचे असते. हा दृष्टीकोन सांगितल्यानंतर कामगारांमध्ये जागृती झाली व त्यांचे संघटन झाले. हा मार्क्सवादी विचारांचा विजय आहे असे म्हणता येते.

---

संदर्भ –

१.पाश्चिमात्य राजकीय विचारवंत – नितीन बिरमल, वैशाली पवार, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती २०१५, ISBN – ९७८८१८४८३५९०८.

२. पाश्चिमात्य राजकीय विचारवंत – भा.ल.भोळे – पिंपळापुरे पब्लिकेशन नागपूर, प्रथम आवृत्ती २०००

३. पाश्चिमात्य राजकीय विचारवंत – प्रा. राजकुमार रिकामे – सक्सेस पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती २०१५, ISBN – ९७८-९३-५१५८-२२६-१